# सापळा केस

दिनांक १४/१०/२०२०

**आलोसे राजकुमार प्रल्हाद बचाटे, पोलीस नाईक ब.नं.१३५, पोलीस ठाणे परभणी ग्रामीण (वर्ग–३) यांनी ५,०००/– रू मागणी केल्याची यशस्वी लाच मागणी कारवाई**

यातील तकारदार यांनी अे.सी.बी.कार्यालय परभणी येथे दि. १०.१०.२०२० रोजी समक्ष हजर राहुन तकार दिली की, तकारदार हे ढाबा चालक असुन दि.०९.१०.२०२० रोजी अंदाजे रात्री ११.१५ वा तकारदार हे ढाबा बंद करून त्यांचे स्टाफसह जेवण करत बसलेले असताना ग्रामीण पोलीस ठाण्याचे गाडेकर मॅडम व पोलीस कर्मचारी बचाटे हे शासकीय वाहनाने त्यांचे ढाब्यावर आले व त्यांनी तकारदार यांचा संपुर्ण ढाबा व बाजुचे साई पान शॉप तपासले परंतु त्यांना दारू सापडली नाही. त्यावरून पोलीस कर्मचारी बचाटे यांनी तकारदार यांना ढाब्याचे बाहेर घेवुन आले व त्यांना उद्या सकाळी पोलीस ठाण्यात येण्यास सांगीतले. त्यानुसार तकारदार हे दि. १०.१०.२०२० रोजी पोलीस ठाणे परभणी ग्रामीण येथे गेले असता त्यांची पोलीस कर्मचारी बचाटे यांची भेट झाली. त्यानंतर पोलीस कर्मचारी बचाटे यांनी दहा हजार दे, तुझेवर केस करीत नाही असे तकारदार यांना सांगीतले. त्यावरून तकारदार यांनी त्यांचेकडे तेवढे पैसे नाही असे पोलीस कर्मचारी बचाटे यांना सांगीतले असता पोलीस कर्मचारी बचाटे तकारदार यांना म्हणाले की, तु थोडयावेळाने ये पण पाच हजार रूपये तरी घेवुन ये असे म्हणून लाचेची मागणी केली आहे. त्यांच्या विरूध्द कारवाई करावी वगैरे मजकुराची तकार दिली होती.

त्यानुसार लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या कार्यवाहीत दिनांक १०.१०.२०२० रोजी पोलीस कर्मचारी यांनी तकारदार यांचेवर केस न करणेसाठी व ढाबा चालवु देण्यासाठी ५,०००/– रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्यास संमती दिली होती व लाचेची रक्कम सांगीतल्याप्रमाणे घेवून येण्याचे सांगीतले होते. परंतू नमुद आलोसे यांना तकारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी सदरची लाचेची रक्कम स्विकारली नाही व ते आता तकारदार यांचेकडून लाच स्विकारणार नाहीत असे तकारदार यांनी सांगीतले आहे. म्हणून यांचे विरूध्द पो.स्टे नानलपेठ गुरनं ६१९/२०२० कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्रीमती. कल्पना बारवकर, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड व मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती. अर्चना पाटील, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री. भरत केशवराव हुंबे, पोलीस निरीक्षक श्री.अमोल कडु, पोना/कटारे, पोना/कुलकर्णी, पोह/हनुमंते, पोह/शेखशकील, पोशि/धबडगे, पोना/शेख मुखीद, पोशि/चट्टे, मपोशि/टेहरे, मपोशि/दंडवते, चापोह/चौधरी, चापोना/कदम अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तकार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणा–या कारवाई बावत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या कमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी कमांक ०२४५२–२२०५९७**

**टोल फ्री कमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती. कल्पना बारवकर,,पोलीस अधिक्षक, ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड मो.नं. ८८८८८४१९६५

श्रीमती. अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड मो.नं. ९६६५४७९३३३

श्री.भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला. प्र. वि. परभणी मो.नं. ७०२१००२११०

श्री.अमोल कडु, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. परभणी मो.नं. ८०८७०७२९१९

Scanned with CamScanner